REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ३१ जुलै, १९४० अंक ३१

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील अँड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात दर हजारी हयातींत
रु. ६० रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें.

# विविध माहिती

### फळें पाठविता आलीं नाहींत

सरहद्द प्रांतात पिकणारीं पीच व इतर फळें दरसाल ग्रेट-ब्रिटनच्या राजेसाहेबांकडे भेट म्हणून पाठविण्यांत येतात, परंतु वाहतुकीच्या आगबोटींच्या अडचणीमुळें यंदा तीं पाठवितां आलीं नाहींत.

### रेल्वे कंपन्यांची खरेदी

बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वे व आसाम बेंगाल रेल्वे ह्यांचे हिंदुस्थान सरकारशीं झालेले करार ३१ डिसेंबर, १९४१ रोजीं संपतात. बेंगाल ॲन्ड नॉर्थ वेस्टर्न रेल्वे व रोहिलखंड ॲन्ड कामोन रेल्वे ह्यांचे करार ३१ डिसेंबर, १९४२ असेर संपतात. ह्या रेल्वेज सरकारास विकत घ्यावयाच्या असल्यास रेल्वे कंपन्यांना १२ महिने अगोदर नोटीस द्यावी लागेल. ह्या खरेदीसंबंधीं चौकशी करण्याकरितां रेल्वे बोर्डानें एक अधिकारी नेमला आहे.

### पोर्ट ट्रस्टचें नवीन कर्ज

मुंबई पोर्ट ट्रस्ट ३० वर्षें मुदतीचें ४ टक्क्यांचें कर्ज काढण्यासाठीं सरकारकडे परवानगी मागणार आहे. ८ लक्ष रुपयांचा भांडवली खर्च भागविणें हा त्याचा उद्देश आहे. ट्रस्टचें स्वतःचेच फंड ह्या कर्जांत गुंतविले जातील.

### हिंवतापास बळी

हिंदुस्थानांत दरसाल ६० लक्ष लोक मृत्युमुखीं पडतात, त्यापैकीं १० ते १५ लक्ष लोकांच्या मृत्यूचें कारण हिंवताप हें असतें. शहराचे मानानें खेडेगांवांत हिंवताप अधिक आहे. ५ हजारांपेक्षा अधिक फूट उंच असलेल्या ठिकाणीं हिंवतापाचा उपद्रव होत नाहीं.

### अपेक्षेपेक्षा उत्पन्न अधिक झालें

१९३९-४० मध्यें फडनवीसांच्या अंदाजाचे मानानें हिंदी मध्यवर्ती सरकारास चांगलें उत्पन्न झालें. इन्कम टॅक्स व कॉर्पोरेशन टॅक्स ह्यांपासून सरकारास दुरुस्त अंदाजापेक्षा ४ कोटि रुपये अधिक मिळाले. नव्या ज्यातीवरील कराचे कायद्यामुळें सरकारचें उत्पन्न वाढलें आहे. कस्टम्स आणि एक्साइज ह्यांचें ५० कोटि रुपये उत्पन्न होईल, अशी अपेक्षा होती; प्रत्यक्ष उत्पन्न ५३ कोटि रुपयांपेक्षा अधिक झालें आहे. मीठ, अफू, पोस्ट व तारखातें ह्या सर्वांचें उत्पन्न वाढलेलें आढळलें. एकूण उत्पन्न ८७ कोटि, ७६ लक्ष रुपये अपेक्षित होतें; प्रत्यक्ष उत्पन्न ९५ कोटींपर्यंत गेलें आहे.

### टाटा आयर्न ॲंड स्टील कं. लि.

वरील कंपनीस ३१-३-४० असेर संपलेल्या वर्षीं, इन्कमटॅक्स, सुपर टॅक्स, जादा नफ्यावरील कर इत्यादींची तरतूद करून आणि ५० लक्ष रुपये घसाऱ्यासाठी बाजूस काढून ३ कोटि, ५७ लक्ष रुपये नफा झाला. डिव्हिडंड देण्याकडे २ कोटि, १४ लक्ष रुपयांचा विनियोग करण्यांत आला. नोकरवर्गास तीन महिन्यांच्या पगाराइतकी रकम ( म्हणजे ४३ लक्ष, ९० हजार रुपये ) बोनस देण्यांत आली. यंत्रसामुग्रीच्या वाढत्या कार्यक्षमतेमुळें कंपनीचें उत्पादन पुष्कळच वाढलें.

### जादा नफ्यावरील कर

हिंदुस्थानांत बसविण्यांत आलेल्या जादा नफ्यावरील कराचे कक्षेत २३ ते ३ हजार लोक येतील, असा अंदाज आहे. त्यांनीं आपल्या उत्पन्नाचे भरून पाठवायाचे तक्ते व ते भरण्याबाबत सूचना तयार करण्याचें काम सध्या चालू आहे.

### नवीन कमी चांदीच्या अधेल्या

सध्याच्या अधेलींत अकरा बारांश इतकी चांदी असते, ती एक द्वितीयांश करण्यांत यावयाची आहे. हीं नवीन नाणीं विस्तारास व वजनास जुन्या सारखींच असलीं तरी आवाज मात्र नवीन नाण्यांचा अधिक खणखणीत आहे.

### जर्मनी आणि तुर्कस्तान ह्यांचेमधील व्यापारी करार

जर्मनी आणि तुर्कस्तान ह्यांचेमध्यें ता. २५ जुलै रोजीं एक व्यापारी करार झाला. हा करार तुर्कस्तानाच्या जुन्या राजकीय संबंधांस विरोधक नाहीं, कारण त्यानें जर्मनीशीं आपण व्यापार करणार नाहीं; असें स्वतःवर कोठेंच बंधन घालून घेतलेलें नाहीं, असें जाहीर झालें आहे.

### रॉकेल व पेट्रोल भरपूर आहे

हिंदुस्थानांत रॉकेल व पेट्रोल ह्यांचा भरपूर साठा आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. सध्याचे भाव डिसेंबर असेर चालू राहून नंतर त्यांची पुनः तपासणी होईल आणि पुढील सहा महिन्यांकरितां बाजारभाव निश्चित केले जातील. बाजारभाव सध्या सरकारनें ठरवून दिलेले नसून, तेलाच्या कंपन्यांनीं उत्पादन खर्च वाढल्याखेरीज भाव आपण वाढविणार नाहीं असें कबूल केलें आहे.

### वालचंद शेटजींची विमानांची नवी कंपनी

विमानें, त्यांचे सुटे भाग, इत्यादि तयार करण्यासाठी एक संयुक्त भांडवलाची कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे. तिचें अधिकृत भांडवल ५ कोटि रुपये आहे. कंपनीचें नांव इंडियन एअरक्राफ्ट कं. लि. असें आहे. शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीकडे मॅनेजिंग एजन्सी राहील, असें समजतें. कंपनीचा कारखाना बंगलोर येथें उभारण्यांत येईल. तज्ञ सल्लागार परदेशांतून आणविण्यांतील अडचणी, यंत्रसामुग्रीच्या किंमतीमधील वाढ, हुंडणावळीवरील निर्बंध, तयार होणाऱ्या मालास कायम गिऱ्हाईक मिळण्याची शक्याशक्यता, इत्यादि गोष्टींचा विचार पूर्णपणें झाल्यावरच पुढें पाऊल टाकावें लागेल, हें उघड आहे. श्री. वालचंद हिराचंद आणि श्री. शांतिकुमार मुरारजी हे कंपनीचे पहिले डायरेक्टर आहेत.

### बँकेचें प्रिव्ही कौन्सिलकडे अपील

घुतराम ह्यानें स्टेट एडेड बँक ऑफ त्रावणकोर, लि. मध्यें १५ हजार रुपये ठेवले, ते परत मिळावेत असा मुंबईतील कोर्टाकडे अर्ज केला. बँकेची नोंदलेली कचेरी त्रावणकोरच्या संस्थानी हद्दींत अलेप्पी येथें आहे. तिची मुंबईस कचेरी नाहीं. मूळ कोर्टानें व अपील कोर्टानें घुतरामचे बाजूनें निकाल दिला, त्यावर बँकेनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें. असेर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील नेण्यास बँकेनें हायकोर्टाची मंजुरी मागितली ती देण्यांत आली.

### डिफेन्स लोन्सः १९-७-४० पर्यंतचे आकडे

| | रु. |
|---|---|
| बिनव्याजाचे बाँड | १,२५,६६,००० |
| ३% बाँड | ५०,११,००० |
| पो. ऑ. १० वर्षांची सर्टिफिकिटें | २३,१९,००० |

### ग्रामोफोनवर प्रचार

इंग्लंडनें युद्धांत पडण्याचें कारण समजावून सांगणाऱ्या आणि युद्धांत विजय मिळण्याचा त्याचा विश्वास स्पष्ट करणाऱ्या ग्रामोफोनच्या तबकड्या तयार करून त्या हॉटेलवाल्यांस वाजविण्यासाठी देण्याचा अहमदाबादमध्यें प्रयत्न चालू आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३६२ |
| २ इंग्लंडचा अवाढव्य युद्धसर्च ... | ३६३ |
| ३ ब्रिटिश बँकांच्या व्यवहाराचे आकडे ... | ३६४ |
| ४ स्फुट विचार ... एक रुपयाच्या नोटा निघाल्या—नवीन नोटांचें स्वरूप—टारिफ बोर्डाची चौकशी पुढें ढकलली—ब्रुएरी कॅनॉल कं. चा घटलेला नफा—व्यावहारिक राजकीय धोरण. | ३६५ |
| ५ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया | ३६७ |
| ६ नवयुग चित्रपटाची पहिली कलाकृति ... | ३६८ |
| ७ हिंदुस्थान सरकारची कर्जे | ३६८ |
| ८ आयुर्विमा व्यवसायावर युद्धाचे परिणाम ... | ३६९ |
| ९ हिंदी सासरेंत सुधारणा | ३७० |
| १० निवडक बाजारभाव | ३७१ |


# अर्थ

बुधवार, ता. ३१ जुलै, १९४०

## इंग्लंडचा अवाढव्य युद्ध-सर्च

जर्मनीचा पूर्ण पराभव होई पावेतों युद्ध चालू ठेवण्याचा दृढनिश्चय इंग्लंडनें केला असल्यानें आणि ह्या बाबतींतली सर्व जबाबदारी ह्या राष्ट्रावर येऊन पडल्यानें ब्रिटिश तिजोरीचा सर्च बेसुमार वाढणें साहजिक आहे. ब्रिटिश फडनवीस, सर चार्लस किंगसले वुड, ह्यांनीं कॉमन्स सभेस गेल्या आठवड्यांत बजेट सादर केलें, त्यावरून ह्या अवाढव्य सर्चाची कल्पना येण्यासारखी आहे. सरकारचा वाढता सर्च म्हणजे ब्रिटिश जनतेस करावा लागणारा अपूर्व स्वार्थत्याग होय. ब्रिटिश लोकांचें प्रस्तुत युद्धाच्या मुळाशी असलेलें ध्येयवादित्व आणि त्याच्या साधनासाठी पडेल तो स्वार्थत्याग करण्याची तयारी ह्यांच्याबरोबरच त्या राष्ट्राचें आर्थिक सामर्थ्य हीं जगाच्या निदर्शनास आलीं आहेत. चालू वर्षी युद्धाप्रीत्यर्थ २०० कोटि पौंड सर्च होतील असा अंदाज गेल्या एप्रिलमध्यें बजेटाचे वेळीं देण्यांत आला होता. तो अर्थातच पुष्कळसा कल्पनेवर आधारलेला होता. अलीकडे प्रत्यक्ष झालेल्या सर्चांच्या अनुभवावरून ह्या अंदाजामध्यें पुष्कळ वाढावा येणार हें स्पष्ट दिसत आहे. चालू वर्षाचा युद्धसर्च २८० कोटि पौंड होईल असा हिशेब धरून बजेट दुरुस्त करावें लागलें आहे. दर आठवड्यास ४ कोटि पौंड युद्धासाठी सर्च होतील असें गेल्या एप्रिलमध्यें वाटत होतें. परंतु गेल्या कांहीं आठवड्यांत हा आकडा ५ कोटि झाला असून अलीकडे तर त्यासहि शेंडी फुटली आहे. युद्धसर्च धरून ब्रिटिश सरकारचा एकूण सर्च चालू सालांत ३४६ कोटि पौंडांवर जाणार आहे. उत्पन्न वजा जातां निवळ सर्चाचा आकडा २२० कोटि पौंड इतका होईल असा रंग दिसत आहे.

उत्पन्न व सर्च ह्यांचेमधील ही खिंड प्रचंड आहे, ह्यांत शंका नाहीं. पण ती भरून काढण्याची व्यवस्था करणें दुष्कर आहे असें नव्हे, ह्या आशयाचा आत्मविश्वास ब्रिटिश फडनवीसांनीं प्रकट केला आहे. कांहीं मर्यादेच्या पलीकडे युद्धसर्च करांच्या उत्पन्नामधून भागवणें अशक्य असून जरूर असलेला पैसा अन्य मार्गांनीं म्हणजे मुख्यतः कर्जाचे द्वारा उभा करावा लागणार आहे. इंग्लंडच्या बाहेर सर्चावा लागणारा पैसा लागलींच तिकडे पाठवण्याची जरूर पडावयाची नाहीं. [ १ ] ब्रिटिश सरकारच्या मालकीचें सोनें इंग्लंडच्या बाहेर आहे, त्यास इतर राष्ट्रांची मागणी असल्यानें त्यांचे देणें ह्या सोन्याच्या मोबदल्यानें भागवतां येईल. [ २ ] ब्रिटिश नागरिकांकडून सरकारनें परराष्ट्रीय कर्जरोखे विकत घेतले आहेत त्यांचा उपयोग ह्या कामीं होईल. [ ३ ] ब्रिटिश वसाहती आणि हिंदुस्थान ह्यांच्या मालाच्या किंमती त्यांस लागलीच देण्यांत येत नसून त्यांच्या देण्याच्या शिलका म्हणून लंडनमध्यें ठेवल्या जात आहेत किंवा अल्पमुदतीच्या रोख्यांत गुंतवण्यांत येत आहेत. हें सर्व असलें तरी अखेरीस ब्रिटिश जनतेच्या बचतीमधून कर आणि कर्ज ह्यांचे स्वरूपांतच युद्धसर्चाचा पैसा सरकारी तिजोरीस मिळावा लागेल.

सरकारचा युद्ध-सर्च अवाढव्य प्रमाणांत चालत असतां गुंतागुंतीचे अनेक आर्थिक प्रश्न उपस्थित होतात आणि ते कुशलतेनें सोडवावे लागतात. सरकारी सर्चाचा पैसा निरनिराळ्या स्वरूपांत जनतेच्या हातांत जातो आणि त्यांची प्राप्ती वाढते. वाढलेल्या वैयक्तिक व कौटुंबिक मिळकतीचा परिणाम रोजचा सर्च वाढण्यांत होतो. देशांतील कारखान्यांत तयार होणारा माल तेथल्या तेथेंच सपला तर निर्गत व्यापार मर्यादित होतो. हा व्यापार योग्य प्रमाणांत चालू रहाण्याचें युद्ध कालांत विशेष महत्त्व असतें. परराष्ट्रीय देणें शक्य तितकें मर्यादित करून हुंडणावळ स्थिर ठेवणें सरकारास आवश्यक असतें. मालाच्या अंतर्गत सपास आळा घालण्याचें धोरण आपणांस अंगिकारावें लागेल असें सर चार्लस किंगस्ले वुड ह्यांनीं सांगितलें. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपाच्या करांत वाढ करण्याची आपली योजना त्यांनीं कॉमन्स सभेपुढें मांडली. दर पौंडास साडेचार शिलिंग ह्या दरानें प्राप्तीवरील करांचें उत्पन्न पांच वर्षांमागें २९ कोटि पौंड येत असे. तें अलीकडे ५२ कोटींच्या वर गेलें आहे. ह्या कराच्या दरांत दर पौंडास ८½ शिलिंग अशी वाढ करण्याचें फडनवीसांनीं ठरवलें आहे. प्राप्तीवरील कराची वसुली सुलभ व्हावी ह्या हेतूनें तो पगार व मजुरी देतांनाच मालकांनीं कापून घ्यावा अशी व्यवस्था करण्यांत यावयाची आहे. विशिष्ट जातींची दारू व तंबाखू ह्यांच्यावरील जकात वाढवण्यांत आली आहे. करमणुकीवरील करांतहि वाढावा करण्यांत आला आहे. ह्या सर्व योजनेपासून चालू सालीं ८–९ कोटि आणि सबंद वर्षांत १३ कोटि पौंड सरकारी उत्पन्न वाढेल असा अंदाज आहे.

विशिष्ट प्रकारच्या मालाच्या सरेदीवर कर बसविणेंहि आतां आवश्यक झालें आहे. ज्या गोष्टी लोक केवळ चैनीखातर घेतात अशांच्या घाऊक किंमतीच्या एक तृतीयांशाइतका त्यांचेवर कर लादला जाईल. म्हणजे, किरकोळ किंमतीवर त्याचा बोजा सुमारें २४% बसेल. फर, रेशीम, लेस, चिनिमातीचीं भांडीं, सौंदर्यसाधनें, वगैरेंवर हा कर बसेल. कापड, पुस्तकें, बूट, घरांत लागणारीं भांडीकुंडीं, वर्तमानपत्रें, मासिकें, वगैरेंवरहि कर बसविण्यांत आला आहे, परंतु त्याचा बोजा थोडा कमी आहे. खाद्य-पेयें, सर्पण, गॅस, वीज, पाणी, मुलांचे कपडे, शेतीस लागणारी यंत्रसामुग्री, इत्यादींस ह्या कराची माफी आहे. " परचेस टॅक्स "च्या मूळ योजनेप्रमाणें सरकारास जेवढें उत्पन्न मिळालें असतें, त्यापेक्षा ह्या नवीन योजनेनें तें कमी

मिळेल. गेल्या एप्रिलमधील करयोजनेप्रमाणें मिळणारे सुमारें १३ कोटि पौंड आणि आतां मिळणारे सुमारें २४ कोटि पौंड, मिळून आतां वार्षिक सुमारें ३७ कोटि पौंड जादा उत्पन्नाची तरतूद झाली आहे. जादा नफ्यावरील करापासून सरकारास ४ कोटि पौंड मिळतील, ते वेगळे.

उत्पन्न आणि खर्च ह्यांतील तफावत भरून काढण्याकरितां ब्रिटिश सरकारनें वरीलप्रमाणें उपाययोजना केली आहे. तथापि, युद्ध-खर्च कराचे उत्पन्नांतून सर्वस्वी भागविता येणें कठीण आहे. कराचें उत्पन्न एकदम हातीं येत नाहीं; करवसुली वर्षभर चालू असते. कर्ज उभारलें म्हणजे त्याची रकम तावड-तोब हातीं येऊं शकते. कर्जरूपानेंहि ब्रिटिश सरकार युद्ध-खर्चाचा तरतूद करीत आहे. जनतेच्या बचतीमधून सर-कारनें सुमारें ६६ कोटि पौंड मिळविले आहेत. कर आणि कर्ज ह्या दोन मार्गांनीं ब्रिटिश सरकार युद्धास लागणाऱ्या पैशाची व्यवस्था करीत आहे आणि हा वाढता बोजा तेथील जनता उत्साहानें सहन करीत आहे. करवाढ ही लोकांवर लाद-लेली एक आपत्ति आहे, असा तेथें समज नसून, आपल्या प्राति-निधिक सरकारनें सोइस्कर बोजाची ती इष्ट अशी केवळ वाटणी केली आहे, असाच तेथें समज आहे. करवाढीस कोणाचाच विरोध नाहीं. उलट, आणखी कर बसवा, अशी तेथें लोकांची मागणी आहे.

## प्रमुख ब्रिटिश बँकांच्या व्यवहाराचे आकडे

ब्रिटिश बँकांच्या व्यवहारांच्या आकड्यांचें पृथक्करण मागें आम्हीं केलें आहे. लंडनमध्यें मुख्य-कचेरी असलेल्या अकरा प्रमुख ब्रिटिश बँकांच्या व्यवहाराविषयींचे खालीं दिलेले तपशील-वार आकडे बोधप्रद होण्यासारखे आहेत. हिंदुस्थानांत बँकिंगच्या धंद्याचें नियंत्रण करणारा स्वतंत्र कायदा करण्याचा विचार चालला असून त्याच्या तयार झालेल्या मसुद्याचें विवेचन "अर्थ" मध्यें सविस्तर येऊन गेलें आहे. हिंदी बँकांचीं कर्जें, शिलका, रोख्यांतील गुंतवण इत्यादि बाबतींत सूचना करतांना रिझर्व्ह बँकेनें ब्रिटिश बँकांच्या रिवाजाचे दाखले दिले आहेत. त्या बँकांचे ठेवी, रोकड, कर्जें इत्यादि संबंधांतले आकडे खालीं दिले आहेत ते उपयुक्त वाटल्यावांचून रहाणार नाहींत. पहिल्या तक्त्यांतले आकडे कोटि पौंडांचे आहेत. दुसऱ्या तक्त्यांत रोकड, कर्जें, रोख्यांतली गुंतवण इत्यादींच्या रकमांचें ठेवींशीं असलेलें प्रमाण दिलें आहे आणि तें विशेष महत्त्वाचें आहे. ठेवींच्या बँकांकडे आलेल्या पैशाचा विनियोग कसा केला जातो आणि त्याची वाटणी कर्जें, रोख्यांतली गुंतवण व रोकड शिलक ह्यांमध्यें कशी होते, ह्यावर त्या संस्थांची सुरक्षितता व फायदेशीरपणा हीं अवलंबून असतात.

(१)

अकरा प्रमुख ब्रिटिश बँकांचे व्यवहार
(सुमारें कोटि पौंड)

| वर्ष | १९३८ | १९३९ | १९४० एप्रिल |
|---|---|---|---|
| ठेवी | २२७ | २२४ | २३५ |
| रोकड | २४ | २४ | २५ |
| हुकमी तात्पुरतीं कर्जें (कॉलमनी) | १५ | १५ | १५ |
| डिस्कौंट केलेलीं बिलें | २८ | २५ | ३३ |
| रोख्यांत गुंतवण | ६३ | ६० | ६१ |
| दिलेलीं कर्जें | ९७ | ९९ | ९८ |

एकूण ठेवींशीं शेंकडा प्रमाण

| वर्ष | १९३८ | १९३९ | एप्रिल, १९४० |
|---|---|---|---|
| रोकड शिलक | १०·६ | १०·९ | १०·८ |
| हुकमी कर्जें (कॉलमनी) | ६·६ | ६·६ | ६·५ |
| डिस्कौंट केलेलीं बिलें | १२·३ | ११·३ | १४·४ |
| रोख्यांतली गुंतवण | २८·० | २७·० | २६·२ |
| कर्जें | ४२·९ | ४४·१ | ४१·८ |

वरील दोन तक्त्यांपैकी पहिल्यांतील ठेवींचे आकडे पाहिले असतां ब्रिटिश बँकांचें कार्य किती प्रचंड आहे ह्याची कल्पना येते. अकरा बँकांच्या मिळून एकूण ठेवी सुमारें ३,१०० कोटि रुपयांच्या आहेत. प्रत्येक बँकेंत सरासरीनें २८० कोटि रुपये ठेवीदारांनीं ठेवले आहेत. पहिल्या प्रतीच्या बँकांपाशीं प्रत्येकी ५०० कोटि रुपयांच्या ठेवी आहेत! दुसऱ्या तक्त्यावरून असें दिसून येईल कीं, ठेवींच्या १० ते ११ टक्के एवढी रकम रोकड शिलक असून शिवाय, ६½ टक्के रकम कॉलमनीच्या स्वरूपांत आहे. रोख्यांत गुंतवलेली रकम ठेवींच्या चतुर्थांशाइतकी आहे आणि बँकांनीं दिलेल्या कर्जांचें ठेवींशीं प्रमाण सुमारें ४२ टक्के आहे. डिस्कौंट केलेलीं बिलें ११ ते १४ टक्के आहेत. त्यांत सरकारी ट्रेझरी बिलांचा भरणाच प्रामुख्यानें आहे आणि तीं अल्प मुदतीचीं सुरक्षित कर्जेंच होत.


# पैसा फंड ग्लास वर्क्स

तळेगांव (दाभाडे)

कारखान्यांत पूर्वींचा माल चिमण्या, बांगड्या, पेपरवेटस्, चिनीमातीच्या बरण्या, वगैरे मिळत असून नवीन इलेक्ट्रिक शेडस् व ग्लोबस् मिळतात.

कॅटलॉग व माहिती मागवा.

सुपरिंटेंडेन्ट

पैसा फंड ग्लास वर्क्स, तळेगांव.

## स्फुट विचार

### एक रुपयाच्या नोटा निघाल्या

चलनी नोटांच्या मोबदला रुपयाच्या नाण्यास जोराची मागणी येऊन टंचाई व गैरसोय उत्पन्न झाली होती. नाणें सढळ हातानें देण्याची व्यवस्था रिझर्व्ह बँकेनें केली आणि त्या योगानें जनतेंतील गडबड व अस्वस्थता बरीचशी दूर झाली. तथापि, रुपयाच्या नाण्यांचा भरपूर साठा हिंदुस्थान सरकारजवळ असला तरी त्याची काटकसर होण्याचे दृष्टीनें एक रुपया किंमतीच्या चलनी नोटा प्रचलित करण्याची आवश्यकता आम्हीं प्रतिपादिली होती. गेल्या युद्धाचे काळांत काढलेल्या ह्या नोटा सरकारनें बंद करावयास नको होत्या आणि प्रस्तुत युद्ध चालू होतांच तरी निदान त्या त्यांनीं पुन्हां प्रचलित करावयास हव्या होत्या असें म्हणण्याचा उद्देश, विलंब न होतां आतां त्या काढल्या जाव्या असें सुचवण्याचा होता. ह्या कामीं मार्गांत येणाऱ्या अडचणींचा पाढा सरकारच्या बाजूनें प्रसिद्ध झालेल्या खुलाशांत वाचण्यांत आला होता. अखेर, हिंदुस्थान सरकारनें एक वटहुकूम काढून एक रुपयाच्या नोटा प्रचलित करण्याचें ठरवलें ही समाधानाची गोष्ट आहे. हिंदुस्थानांत प्रचलित व्हावयाच्या चलनी नोटांचे बाबतींत रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत तरतूद आहे. मध्यवर्ती सरकारनें एक रुपयाच्या नोटा काढावयाच्या म्हटल्यास त्या कायद्यांतील कांहीं कलमांची दुरुस्ती करावी लागली असती आणि तसें करण्याची सध्या तर सोय नाहीं. हें काम तातडीनें होणें अगत्याचें असल्याकारणानें हिंदुस्थान सरकारनें वटहुकूम काढून जरूर ती व्यवस्था केली आहे. एक रुपयाच्या चलनी नोटांनीं रुपयाच्या नाण्यांची जागा घ्यावी हा प्रस्तुत मुख्य उद्देश असल्यामुळें कायद्यांत "रुपयाचें नाणें" ही संज्ञा आहे तीमध्यें ह्या नोटांचा अंतर्भाव व्हावयाचा आहे आणि सदरहु नोटा म्हणजे रुपयाचीं नाणींच असा हिशेब समजला जाणार आहे. इतर नोटांचे बाबतींत लागू असलेले निर्बंध एक रुपयाच्या नोटांस लागू होणार नाहींत.

---

### नवीन नोटांचें स्वरूप.

एक रुपयाच्या नोटा काढण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे, पण त्या छापून तयार होण्यास वेळ लागेल. ह्या नोटांची किंमत प्रत्येकी केवळ एक रुपया म्हणजे अगदीं थोडी असल्यानें त्यांची एकूण संख्या जनतेची जरूर भागवण्यास फार मोठी असावी लागेल. ह्या मध्यंतरीच्या काळांत १९३५ सालीं सरकारनें विशिष्ट परिस्थितीस तोंड देण्यासाठी एक रुपया किंमतीच्या नोटा तयार केल्या होत्या आणि आजपर्यंत संग्रहीं ठेवल्या होत्या त्या प्रचलित करण्याचें ठरलें आहे. संग्रहांत असलेल्या ह्या नोटांचा सध्याच्या प्रसंगीं अगदीं वेळेवर उपयोग होणार आहे. त्यांची लांबी ५½ इंच आणि रुंदी २¾ इंच आहे. जरूर असलेला कागद मिळण्याची अडचण आणि छपाईस लागणारा वेळ लक्षांत घेतला जाऊन गेल्या महायुद्धाचे वेळच्या नोटांच्यापेक्षा नवीन काढावयाच्या नोटांचा आकार लहान घरण्यांत आला आहे. परिस्थिति अनुकूल होतांच मोठ्या आकाराच्या नोटा काढण्यांत येतील. नाशिक येथील सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसमध्यें नवीन नोटा तयार करण्यांत येत आहेत. त्या व्यवहारांत लोकांच्या हातीं येण्यास अर्थातच कांहीं काळ लागेल. त्यांची लांबी ४ इंच व रुंदी २½ इंच असेल. एक रुपया किंमतीच्या नोटा रुपयांच्या नाण्यांच्या ऐवजीं उपयोगांत यावयाच्या असल्यामुळें नाण्यांची चणचण ह्यापुढें भासण्याचें कारण उरणार नाहीं. हिंदुस्थान सरकारजवळ रुपयांचें नाणें व चांदी ह्यांचा साठा भरपूर असला तरी ज्या नाण्यांची व्यवहारास वास्तविक आवश्यकता नाहीं त्यांचा पुरवठा करण्याचें कारण रिझर्व्ह बँकेस पडूं नये. एक रुपयाच्या नवीन नोटांच्या योगानें इष्ट तो कार्यभाग साधेल अशी अपेक्षा आहे.

---

### टारिफ बोर्डाची चौकशी पुढें ढकलली

कित्येक हिंदी स्वदेशी धंद्यांस जकातींचें संरक्षण देण्यांत आलेलें आहे आणि टारिफ बोर्डानें त्यांचे बाबतींत पूर्ण चौकशी व शिफारस केल्यावरून ही व्यवस्था झालेली आहे. औद्योगिक संरक्षण मर्यादित मुदतीपुरतें असतें आणि तें चालू ठेवावें, कमी करावें किंवा काढून घ्यावें ह्याविषयींचा निर्णय टारिफ बोर्डानें वेळोवेळ चौकशी करून करावयाचा असतो. स्वदेशी साखरेच्या धंद्याचें उदाहरण घेतलें तर असें दिसून येईल कीं, टारिफ बोर्डानें प्रथम चौकशी करून संरक्षणाची मुदत ठरवून दिली. तथापि, तें कमी-ज्यास्त केलें जाण्याचीहि तजवीज त्याचबरोबर केली. तीस अनुसरून गेल्या वर्षी पुन्हां चौकशी व्हावयाची होती आणि अलीकडे साखरेच्या धंद्यांत बरेच फेरबदल झाल्यानें ती हातीं घेण्याचा हिंदुस्थान सरकारचा मानस होता. तथापि युद्धाचे काळांत राजकीय व आर्थिक परिस्थिति इतकी अनिश्चित व अस्थिर झालेली असते आणि व्यापाराची घडी इतकी बिघडून गेलेली असते कीं, त्या वेळीं टारिफ बोर्डाची चौकशी अत्यंत गैरसोयीची होते आणि शिफारशी करणें त्यास फार कठीण होतें कोठल्याहि धंद्याची स्थिति स्थैर्याची असल्यावांचून त्याच्या भवितव्याचे बाबतींत कोणतीहि अनुमानें काढणें आणि त्यांच्या आधारावर संरक्षणात्मक धोरण ठरवणें धोक्याचें होतें. हें लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें साखर, लोखंड, पोलाद आणि जरतार ह्या धंद्यांच्या संरक्षणाची चौकशी तूर्त पुढें ढकलली आहे. लोखंड व पोलाद ह्यांचा माल पूर्वी ज्या बाहेरच्या देशांतून हिंदुस्थानांत येत असे, त्यांची आर्थिक व राजकीय स्थिति युद्धामुळें सर्वस्वी बदलून गेली आहे आणि ती येत्या बारा महिन्यांत कशी होईल- हें सांगतां येणें अशक्य आहे. तेव्हां टारिफ बोर्डानें ह्या संबंधांत करावयाची चौकशी अवघड होणार, एवढेंच नव्हे तर ती केली गेली तरी शेवटीं फुकट जाणार ह्यांत शंका नाहीं. तेव्हां, स्वदेशी धंद्यांच्या औद्योगिक संरक्षणाविषयींची टारिफ बोर्डाची चौकशी पूर्वी ठरल्याप्रमाणें करण्याची वेळ आली असली तरी वर नमूद केलेल्या कारणांसाठीं ती पुढें ढकलण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे हें योग्य आहे. परंतु त्यांनीं चौकशीवांचून स्वतःच्या इच्छेस येईल त्याप्रमाणें औद्योगिक संरक्षणाच्या धोरणांत कोणताहि बदल करण्याची जबाबदारी आपल्यावर घेतां कामा नये. जी गोष्ट करणें टारिफ बोर्डास कठीण आहे, तिच्या संबंधानें फेरबदल करणें सरकारास व त्यांच्या सल्लागारांस अधिकच कठिण आहे. कांहीं काळपर्यंत आहे तेंच संरक्षण चालू ठेवणें हेंच उचित आहे.

---

### सुएझ कॅनॉल कंपनीचा घटलेला नफा

युद्धामुळें आणि विशेषत: इटली त्यांत पडल्यामुळें सुएझ कालव्यामधील वहातुक घटणें आणि तिच्यापासून येणारें उत्पन्न कमी होणें स्वाभाविक आहे. १९३९ सालाच्या पहिल्या आठ महिन्यांत ही वहातुक थोडीशी घटली होती, पण युद्ध चालू झाल्या-पासून ती घसरगुंडीस लागली. सप्टेंबर महिन्यांत ५० टक्के घट झाली. नंतर थोडी सुधारणा हळुहळु होऊं लागली. १९३९ साल समग्र घेतलें तर त्यांत जहाजांच्या सव्वापांच हजार फेऱ्या कालव्यांतून झाल्या आणि त्यांचें निव्वळ वजन सुमारें तीन कोटि टन भरलें. १९३८ च्या मानानें ह्यांत १४ टक्के घट झालेली दिसली. निवळ नफ्यांत २६ टक्के घट झाली. चालू वर्ष सुएझ कॅनॉल कंपनीस नफ्याच्या दृष्टीनें वाईट जाणार ह्यांत शंका नाहीं. गेल्या मे महिन्यांत १९३८ च्या मे महिन्याचे मानानें वहातुकीचें उत्पन्न ७३ टक्के एवढेंच झालें आणि हें प्रमाणहि ह्यापुढे राहूं शकणार नाहीं हें उघड आहे. कॅनॉलचें उत्पन्न घटलें, त्याबरोबर त्याच्या व्यवस्थेचा खर्च मात्र त्या प्रमाणांत कमी झालेला नाहीं.

---

### व्यावहारिक राजकीय धोरण

ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या पुणें येथें भरलेल्या अधि-वेशनांत विस्तृत चर्चेअंतीं एका अत्यंत महत्त्वाच्या विषयावर ठराव करण्यांत आला. तो विषय म्हटला म्हणजे अहिंसेच्या तत्वाचा राजकीय कारभाराच्या व्यवहारांत विस्तार करण्या-विषयींचा होय. प्रस्तुत युद्धांत हिटलरशाहीचा नाश होऊन लोकशाहीचा विजय होणें अगत्याचें आहे ह्याविषयीं सर्वत्र एकमत आहे आणि त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतली राजकीय चळ-वळ अहिंसेच्या पायावर उभारलेली असलेली पाहिजे ह्यासंबंधानेंहि मतभेद नाहीं. प्रस्तुत युद्धाच्या ज्वाळा ह्या देशास येऊन पोहोंचल्या आणि राष्ट्राचें शत्रूपासून व अंतस्थ बंडाळीपासून संरक्षण करण्याचा प्रसंग उद्भवला असतां जनतेनें अहिंसा-व्रताला चिकटून बसावयाचें का आवश्यक दिसतील त्या मार्गांनीं म्हणजे शस्त्रास्त्रांनीं प्रतिकार करावयाचा ह्या प्रश्नास उत्तर देण्याची जबाबदारी कॉंग्रेसवर येऊन पडली होती. शत्रूच्या व अंतस्थ दंगेखोरांच्या हिंसात्मक हल्ल्याचा प्रतिकार आपल्या अहिंसेच्या बळानें करावा असा महात्मा गांधींचा ठाम अभिप्राय होता आणि त्यास अनुसरून त्यांनीं ब्रिटिश राष्ट्रासहि सल्ला दिला होता. हिटलरशाहीचा नाश होण्यासाठी ब्रिटिश सरकारानें हिंदी राष्ट्रास बरोबरीच्या नात्यानें वाग-वून त्याच्या हार्दिक सहकाराचा उपयोग यशस्वी रीतीनें करून घ्यावा असें कॉंग्रेसचें म्हणणें होतें. पूर्ण अहिंसावाद ह्या भूमिकेशीं विसंगत होता, एवढेंच नव्हे तर कॉंग्रेसच्या नियंत्रणानें अद्याप बरें राज्यकारभार करणाऱ्या प्रांतिक मंत्रिमंडळांच्या धोर-णास सोडून होता. हिंदुस्थानची संपूर्ण राज्यव्यवस्था आपल्या हातीं आली पाहिजे ह्या कॉंग्रेसच्या मागणीसहि पूर्ण अहिंसावादाचा विरोध होणार आहे. अहिंसेच्या भूमिकेवर उभें राहून कॉंग्रेसला हिंदी राष्ट्राचें राजकीय नेतृत्व हातीं घेणें अशक्य आहे. महात्मा गांधींचा सर्वव्यापी व आत्यं-तिक अहिंसावाद सध्याच्या जगाच्या आणि हिंदुस्थानच्या परिस्थितीत अव्यवहार्य आहे ही गोष्ट ऑल इंडिया कॉंग्रेस कमि-टीच्या बहुमतानें मान्य केली आहे हें प्रगतीच्या मार्गांत पुढें पाऊल आहे असें म्हटलें पाहिजे. कॉंग्रेस ही राजकीय उद्दिष्ट असलेली आणि राजकीय कार्यक्रम हातीं घेतलेली संस्था आहे आणि नैतिक व आध्यात्मिक उन्नति एवढेंच तिचें ध्येय नाहीं. ह्या दृष्टीनें व्यवहार्य काय आहे आणि अव्यवहार्य काय आहे ह्याचा विचार करणें तिला प्राप्त आहे. ह्यामध्यें महात्मा गांधींस विरोध करण्याचा किंवा त्यांच्या उच्च तत्त्वांपासून च्युत होण्याचा प्रश्न नाहीं. महात्माजींच्या प्रमुख पट्टशिष्यांच्या नेतृत्वानेंच ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें बहुमतानें पुण्याच्या अधिवेशनांत एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचा निर्णय केला आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

---

### रिझर्व्ह बँकेच्या भागांची वांटणी

रिझर्व्ह बँकेच्या भागीदारांची संख्या कमी होत चालली असून भागांची वांटणी मूळ योजनेप्रमाणें कायम न रहातां भाग मुंबई-मध्यें एकत्रित होऊं लागले आहेत, अशी जुनी तक्रार आहे. त्याविषयीं " अर्थ "मध्यें वेळोवेळ आकडेवार माहिती आम्हीं दिलेली आहे. भागांच्या वांटणीची मूळ योजना आणि त्याबाबत आजची परिस्थिति ह्यांचें दिग्दर्शन खालील तक्त्यांत आढळेल:—

भागांची विभागवार वांटणी

| विभाग | मूळ कायद्याची योजना | आजची वांटणी |
|---|---|---|
| मुंबई | १,४०,००० | २,१०,५१५ |
| कलकत्ता | १,४५,००० | १,१९,६७१ |
| दिल्ली | १,१५,००० | ९१,०६३ |
| मद्रास | ७०,००० | ६०,२४९ |
| रंगून | ३०,००० | १८,५०२ |
| | ५,००,००० | ५,००,००० |

गेल्या सहा महिन्यांत मुंबई यार्डीतील भागांची संख्या तीन हजारांनीं वाढली. कलकत्ता आणि दिल्ली यार्डीतील बरेच भाग मुंबईमधील लोकांनीं घेतले.

रिझर्व्ह बँकेचे भाग अधिकांत अधिक लोकांच्या हातांत रहावे हा मूळ उद्देश. ते भाग कांहीं लोकांनींच काबीज करण्याचें धोरण अंगीकारल्यास तो सफल होणें अशक्य होतें. ही प्रवृत्ति थांबविण्या-करितां कोणत्याहि भागीदारानें २०० भागांपेक्षा अधिक भाग धारण करतां कामा नये अशी रिझर्व्ह बँक ॲक्टांत गेल्या मार्च मध्यें दुरुस्ती करण्यांत आली. भागीदारांची संख्या १९३५ सालीं ९२ हजार होती, ती डिसेंबर १९३९ अखेर ५७,१९२ झाली आणि आतां ती ५६,०५७ आहे. भाग धारण करण्याची मर्यादा कायद्यानें घालून दिली, तरी तिचा उपयोग झालेला दिसत नाहीं. प्रत्येक भागीदार आज सरासरीनें ८·९ भाग धारण करीत आहे.

---

### एव्हररेडी

ड्रायसेल्स, बॅटऱ्या, रेडिओ साहित्य, इत्यादींचें उत्पादन कर-णाऱ्या एव्हररेडी कंपनी लि.ला ३१ मार्च, १९४० अखेर संप-लेल्या वर्षीं सुमारें ९५ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस २५% डिव्हिडंड व ५% बोनस मिळालें. युद्धामुळें ग्रेटब्रिटनमधील शह-रांत रात्रीं अंधारांत काढाव्या लागतात. त्या कारणानें एव्हर-रेडीच्या मालास विलक्षण मागणी आली, ती पुरविणें अतिशय अवघड गेलें. मालाच्या उत्पादनाचा खर्च वाढला असतां, तरी विक्रीची किंमत वाढलेली नाहीं.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

### १९४० च्या पहिल्या सहामाहीचा आढावा

बँकेच्या डायरेक्टरांच्या रिपोर्टांत १९४० च्या पहिल्या सहा महिन्यांतील आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यांत आला आहे, त्याचा सारांश खाली दिला आहे:—

#### युद्धाचा परिणाम

ह्या सहामाहींतील आर्थिक परिस्थितीवर युद्ध-परिस्थितीचा प्रभावी परिणाम झाला. युद्धांत सामील झालेल्या राष्ट्रांस युद्ध-कार्यासाठी आपली सर्व आर्थिक शक्ति एकवटावी लागली आणि त्यामुळें व्यापार व वहातुक ह्यांत अडथळे उत्पन्न झाले. कारखाने, कामगार, इत्यादींवर कडक नियंत्रण घालणें भाग पडलें. तटस्थ राष्ट्रांत प्रारंभीं बाजारभाव वाढून उत्पादनास चालना मिळाली, परंतु युद्धामुळें गेलेल्या गिऱ्हाइकाची जागा नवीन गिऱ्हाइकानें भरून काढली गेली नाहीं. अमेरिकेंत विशेषतः हें घडून आलें.

#### चलनास मागणी

पैशास मागणी चांगली होती, कारण तो पैसे लागण्याचा मोसमच होता. शिवाय बँका आणि व्यक्ती स्वतःजवळ रोकड ज्यास्त बाळगूं लागल्यामुळेंहि पैसा अधिक लागला. तथापि, पैशाची चणचण भासली नाहीं आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया रेट ३% कायम होता.

#### ट्रेझरी बिलें

पहिल्या दोन महिन्यांत ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर सुमारें ९% पडला, तो पुढें उतरत जाऊन १% वर आला. जानेवारी ते एप्रिल, १ कोटि रुपयांचीं बिलें दर आठवड्यास विकण्यांत आलीं; मे व जूनमध्यें २ कोटि रुपयांचीं बिलें विकलीं. मधेंहि कांहीं बिलें विकलीं. सहामाहींत एकूण ५१ कोटि, ८९ लक्ष रुपयांचीं बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द.सा.द.शें. १ रु. ९ आ. १ पै इतका पडला. गेल्या वर्षीच्या पहिल्या सहामाहींत तो २ रु. २ आ. ० पै पडला होता.

#### फ्रान्सची शरणागति

१९४० च्या पहिल्या सहामाहींत हिंदी परराष्ट्रीय व्यापारांत वाढ झालेली आढळते. वहातुकीसंबंधीं अडचण असूनहि हिंदी आयात व निर्गत व्यापार वाढला. कारखान्यांतील उत्पादनहि कायम राहिलें. मालाच्या किंमती १९३९ च्या अखेरीस चढल्या होत्या, त्या मात्र टिकूं शकल्या नाहींत. पैशाच्या बाजारावर युरोपांतील घटनेचा विशेष प्रतिकूल परिणाम झाला नाहीं. मात्र फ्रेंच सरकार जर्मनीस शरण गेल्यानंतर थोडी चलबिचल झाली. जूनच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत सरकारी कर्जरोख्यांच्या किंमती स्थिर होत्या; त्यानंतर खाली गेल्या आणि मुंबई स्टॉक एक्स्चेंजला त्यांच्या किमान किंमती ठरवून टाकाव्या लागल्या. जून अखेरीस एकंदर वातावरण अस्थिरच होतें, परंतु पालटलेल्या परिस्थितीस अनुसरून तें स्थिरावत चाललें होतें.

#### डिफेन्स लोन्स

४ जून रोजीं सरकारानें आपली युद्धकर्जाची योजना जाहीर केली, त्यांत १० वर्षे मुदतीच्या सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांचा, सहा वर्षे मुदतीच्या बाँड्सचा आणि बिनव्याजाच्या बँड्सचा समावेश होता. ज्या लोकांस सध्याच्या निकडीच्या वेळीं सरकारास मदत करावयाची आहे परंतु राष्ट्राभिमानानें प्रेरित होऊन अगर धार्मिक कारणाकरितां ज्यांस व्याज घेण्याची इच्छा नाहीं, अशांविसाठीं बिनव्याजाच्या कर्जाची योजना आहे.

#### आयात-निर्गत

हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश ह्यांतून जानेवारी ते मे अखेर १११ कोटि, ६४ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची निर्गत झाली, आणि ७० कोटि, ९३ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची आयात झाली. १९३९ चे तत्सम आकडे अनुक्रमें ७५ कोटि, ९६ लक्ष आणि ६१ कोटि, ४५ लक्ष, असे आहेत. म्हणजे, आयात निर्गतीमधील अनुकूल तफावत १४ कोटि, ५१ लक्षांची, ४० कोटि, ७१ लक्ष झाली. ग्रेटब्रिटननें अधिक माल घेतला. आणि मालाची किंमतहि वाढलेली होती, त्यामुळें ही वाढ दिसून येते.

#### शेड्यूल्ड बँका

१९४० च्या पहिल्या सहामाहींत शेड्यूल्ड बँकांच्या संख्येंत भर पडली नाहीं, परंतु दोन बँका यादींतून गळाल्या आणि शेड्यूल्ड बँकांची एकूण संख्या ६१ ची ५९ झाली. एका बँकेचें दुसऱ्या बँकेशीं एकत्रीकरण झालें आणि एक बँक गुंडाळण्यांत आली, त्यामुळें वरील फरक झाला. ह्या सहामाहींत शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या १,२७७ ची १,३२२ झाली. म्हणजे त्यांत ४५ ची भर पडली. ६३ शाखा नव्यानें उघडण्यांत आल्या व १८ बंद केल्या गेल्या. बंद केलेल्या बहुतेक सर्व शाखा शेड्यूल्ड बँकांचें यादींतून बाहेर निघालेल्या बँकांच्याच होत्या.


हृदयाची हांक—

सुलभेच्या कानीं पडतांच तिनें तावडतोब त्या हांकेला 'ओ' दिली. कां? कारण तिला भावनांचा कोंडमारा करावयाचा नव्हता! निसर्गाशीं लपंडाव खेळावयाचा नव्हता! मनाची दिशाभूल करावयाची नव्हती—

लपण्डाव

नवयुग चित्रपट लि. चा
मराठी सामाजिक बोलपट

: भूमिका :

● मीनाक्षी ● विनायक ● साळवी
■ वनमाला, B.A., B.T. ■ मीनाक्षी ■ पवार

'प्रभात' दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या हस्तें शुक्रवारीं ता. २६ पासून तुफान गर्दीत सुरू झाला.

न्यू वेस्ट एण्ड मुंबई

रोज: ४, ७ व ९॥. शनि-रवि जादा खेळ १॥ वा.

प्रकाशक—पीअरलेस पिक्चर्स, मुंबई ४.

## नवयुग चित्रपट लि. ची पहिली कलाकृति

चित्रपटाच्या धंद्यांत महाराष्ट्रीयांनीं चांगलें नांव मिळवलें आहे. तो समाइक भांडवलाच्या संघटित पद्धतीनें चालवावा आणि त्यांत प्रगति घडवून आणावी ह्या उद्देशानें नवयुग चित्रपट कंपनीची उभारणी करण्यांत आली. चित्रपटाच्या कलेमध्यें निष्णात झालेल्या हंस पिक्चर्सच्या चालकांनीं हा उपक्रम स्वतःच्या हातीं घेतल्यानें धंद्याच्या एका महत्त्वाच्या बाजूची व्यवस्था प्रारंभापासूनच भरभक्कम झाली. प्रि. अत्रे ह्यांच्यासारख्या प्रथितयश लेखकाची कथा नवयुग कंपनीनें आपल्या पहिल्या चित्रपटासाठी घेतल्यानें तिच्या कार्यक्रमाची यशस्विता निश्चित झाली. "लपंडाव" हा नवयुगचा पहिला चित्रपट मुंबईस गेल्या शुक्रवारीं न्यू वेस्ट एंडमध्यें मोठ्या थाटानें व समारंभानें चालू करण्यांत आला. पिअरलेस पिक्चर्सचे श्री. सामंत प्रकाशक ह्यांनीं समारंभाची व्यवस्था उत्कृष्ट केली होती आणि प्रभात कंपनीचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक, श्री. शांताराम, ह्यांच्या हस्तें औपचारिक उद्घाटन करण्यांत आलें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. नवयुगचा पहिला चित्रपट पहाण्यास मुंबईची जनता अत्यंत उत्सुक झालेली होती आणि पहिल्या दिवशीं वेळीं प्रवेश न मिळाल्याकारणानें हजारो प्रेक्षकांची निराशा झाली. चित्रपटाच्या धंद्याशीं संबंध असलेली निमंत्रित मंडळी उपस्थित झालेली असून सिनेमागृहांत चिकार गर्दी झाली होती.

### श्री. शांताराम ह्यांचें भाषण

नवयुग चित्रपटाच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष, प्रो. काळे ह्यांनीं स्वागतपर भाषणांत प्रभात फिल्म कंपनी आणि श्री. शांताराम ह्यांचा गौरवपूर्वक उल्लेख करून नवयुगच्या पहिल्या चित्रपटाचें उद्घाटन प्रथितयश दिग्दर्शकांचे हातून होत आहे ही गोष्ट भाग्याची असल्याचें सांगितलें. श्री. शांताराम ह्यांचें भाषण मार्मिक आणि समयोचित असें झालें:—"महाराष्ट्रांत चित्रपटाचा धंदा संघटित स्वरूपांत चालू करण्याचें धाडस नवयुगानें केलें आहे आणि त्यांतील कलावंतांनीं आपल्या धंद्यांत पूर्वीचें नांव मिळविलें आहे, ह्या परिस्थितीचा विचार करून त्यांच्या पहिल्या चित्राचें उद्घाटन करण्याची जबाबदारी उचलण्यास आपण प्रवृत्त झालों. एकजुटीनें काम करण्याची महाराष्ट्रीयांस संवय नाहीं, असा आरोप केला जातो, त्यांत तथ्य नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. हा आरोप खोटा करून दाखवण्याची संधी आपणांपुढें आहे. नवयुगचे कार्यकर्ते ह्या संधीचा उत्कृष्ट फायदा घेऊन भरीव कामगिरी करण्यांत यश मिळवतील अशी मला आशा आहे. "लपंडाव" ह्या नवयुगच्या पहिल्या चित्रपटाचें उद्घाटन झाल्याचें सांगून कंपनीचा उपक्रम पूर्णपणें यशस्वी होवो, असें मी इच्छितों." प्रो. काळे ह्यांनीं नवयुगचे संचालक आणि सर्व कार्यकर्ते ह्यांचे वतीनें श्री. शांताराम ह्यांचे मनःपूर्वक आभार मानले. "स्वदेशी चित्रपटाचा धंदा फार महत्त्वाचा असून त्याच्या प्रगतीस भरपूर वाव आहे ह्याची जाणीव आतां सार्वत्रिक होत आहे. नवयुगची मंडळी आपल्या पुढील ध्येय गाठण्याचा आणि संघटनात्मक रीतीनें कार्य करून धंद्याच्या ह्या उन्नतीस हातभार लावण्याचा प्रयत्न करतील असें मी आश्वासन देतों. ह्या कामीं श्री. शांताराम ह्यांचा आशीर्वाद आम्हांस उत्तेजनदायक होईल ह्यांत शंका नाहीं. समव्यवसायी मंडळींचें सहकार्य आणि जनतेचें सहाय नवयुगाला मिळून त्याचे हातून लोकोपयोगी कामगिरी होईल असा मला विश्वास वाटतो. श्री. शांताराम ह्यांनीं आम्हांस उपकृत केलें आहे ह्याबद्दल त्यांचे मी पुन्हां आभार मानतों !" या आशयाचें प्रो. काळे ह्यांचें भाषण झाल्यावर "लपंडाव" या चित्रपटास प्रारंभ झाला.

## हिंदुस्थान सरकारचीं कर्जें

### हिंदुस्थानांत उभारलेलीं

| | १९३५–३६ कोटि | लक्ष | १९३७–३८ कोटि | लक्ष | १९४०–४१ कोटि | लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्ज रोखे | ४२५ | ३२ | ४३८ | ४० | ४३४ | ६५ |
| ट्रेझरी बिलें | ३२ | १३ | ३८ | ०१ | ३९ | ३० |
| पो. ऑ. सेव्हिंग बँक | ६७ | २५ | ७७ | ५५ | ८० | ७३ |
| पो. ऑ. कॅश सर्टिफिकिटें | ६५ | ९८ | ६० | २१ | ५५ | ४४ |
| प्रॉव्हिडंट फंड | ८६ | २० | ६९ | ६८ | ७७ | ९८ |
| इतर | ९ | ९३ | १० | ७२ | १२ | १७ |
| घसारा रिझर्व्ह फंड | १३ | २४ | २२ | ७८ | ४१ | ६५ |
| प्रांतांच्या शिलका | ४ | ९३ | ... | ... | .... | ... |
| एकूण | ७०४ | ९८ | ७१७ | ३५ | ७४१ | ९२ |

### इंग्लंडमध्यें उभारलेलीं

| | १९३५–३६ कोटि | लक्ष | १९३७–३८ कोटि | लक्ष | १९४०–४१ कोटि | लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्जरोखे | ४२३ | ६८ | ३९६ | ७५ | ३८९ | २१ |
| युद्धसहाय | २२ | २९ | २० | ६२ | २० | ६२ |
| रेल्वे खरेदी | ५५ | ६७ | ५० | ५२ | ४२ | १२ |
| नोकरांचे फंड | १ | ७० | ११ | ९२ | ४ | ०३ |
| एकूण | ५०३ | ३४ | ४७९ | ८१ | ४५५ | ९८ |
| एकूण कर्जें | १,२०८ | ३२ | १,१९७ | १६ | १,१९७ | ९० |

## हिंदुस्थान सरकारचें नवें युद्धकर्ज

व्याजाचा दर : ३% कर माफ नाहीं

परतफेड : १९४६ सालीं, १ ऑगस्ट रोजीं

व्याज केव्हां मिळणार : प्रत्येक सहामाहीनें

कर्जविक्रीस प्रारंभ : १ ऑगस्ट, १९४० पासून

### कर्जरोख्यांची किंमत

| | प्रत्येक १०० रुपयांच्या दर्शनी रोख्यांची किंमत रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| १–८–४० ते १०–८–४० | १०० | ० | ० |
| १२–८–४० ते १७–८–४० | १०० | ० | ९ |
| १९–८–४० ते २४–८–४० | १०० | १ | ६ |
| २६–८–४० ते ३१–८–४० | १०० | २ | ३ |

याप्रमाणें दर आठवड्यास द. सा. द. शे. ९ पै प्रमाणें ३१–१–४१ पर्यंत रोख्यांच्या किंमतींत वाढ होत राहील. ५% १९४०–४२ च्या परत फेडीचे कर्जरोखे स्वीकारून त्याबद्दलीं नवीन कर्जरोखे मिळूं शकतील.

### खरेदीदारांची सोय

हें कर्ज विकत घेतांना रकमेची कमाल मर्यादा नाहीं; बँका, विमा कंपन्या, इत्यादींस कितीहि रकमेचे कर्जरोखे घेणें आतां शक्य झालें आहे. वेगवेगळ्या वेळीं घेतलेल्या पहिल्या युद्ध कर्जरोख्यांची परतफेडीची तारीखहि वेगवेगळी येते, त्यामुळें त्यांची खरेदी-विक्री सुलभतेनें होणें कठीण जाईल, ही तक्रार सरकारनें आतां दूर केली आहे.

## आयुर्विमा व्यवसायावर युद्धाचे परिणाम

युद्धाबरोबर प्राणहानी येते आणि मृत्यूचा धोका वाढतो. आयुर्विम्याचें काम करणाऱ्या मंडळ्यांस युद्ध परिस्थिति अत्यंत काळजीची वाटते आणि त्यांच्या कारभारावर युद्धाचा प्रतिकूल परिणाम होतो. प्रस्तुत युद्ध हिंदुस्थानापासून अजून दूर असल्याकारणानें युरोपांतील देशांप्रमाणें येथें विमा मंडळ्यांस विशेष धोका उत्पन्न झालेला नाहीं. तथापि, युद्धाविषयींच्या भीतिदायक खोट्या बातम्या पसरतात, त्यांचेयोगानें उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या मार्गांत अडचणी उपस्थित होतात. इंडिअन इंशुरअन्स इन्स्टिट्यूट ह्या संस्थेच्या दहाव्या वार्षिक सभेचे प्रसंगीं श्री. एस. सी. रे ह्यांनीं मथळ्यांत दिलेल्या विषयावर विचार प्रकट केले, त्यांचा सारांश खालीं दिला आहे, त्यावरून मागील महायुद्धाचे वेळेच्या मानानें सध्याची परिस्थिति किती तरी चांगली आहे, हें दिसून येईल. रोखे बाजार मधूनमधून बंद होतात, त्यामुळें लोकांमध्यें निष्कारण भलत्या कल्पना पसरतात आणि घाबरटपणा निर्माण होतो. युद्धकाळांत सरकारी कर्जरोख्यांच्या किंमती घसरतात आणि विमामंडळ्यांच्या ताळेबंदीची घडी विस्कटून जाते. परंतु ह्या संबंधांत चालू युद्धांतील परिस्थिति महायुद्धाशीं तुलना करतां किती तरी अनुकूल आहे. गेल्या युद्धाचे प्रारंभापूर्वी साडेतीन टक्क्यांच्या प्रॉमिसरी नोटांचा भाव शेकडा ९६ रुपये होता, तो १९१५ सालीं पहिलें ब्रिटिश युद्ध कर्ज निघालें तेव्हां ८० रुपये झाला. १९१७ सालीं हिंदुस्थानांत प्रथम युद्धकर्ज काढण्यांत आलें तेव्हां प्रॉमिसरी नोटेची किंमत ६५ रुपयांपर्यंत घसरली. चालू युद्धांत हा भाव चांगला वर राहिलेला आहे. इतर बाबतींतहि परिस्थिति समाधानकारक आहे.

हिंदी विमा कंपन्यांसंबंधानें पहावयाचें म्हणजे गेल्या युद्धांत विमेदारांच्या मृत्यूचें प्रमाण अल्प होतें असें दिसून येतें. विमा पॉलिसीजपासून होणारें उत्पन्न, १९१६ साल वगळलें असतां वाढत्या प्रमाणावर असलेलें आढळतें. हिंदी विमा मंडळ्यांच्या उत्पन्नाचे गेल्या युद्धाच्या काळांतले आकडे खालीं दिले आहेत:—

आयुर्विम्यांपासून उत्पन्न

| वर्ष | लक्ष रुपये |
|---|---|
| १९१३ | १२७ |
| १९१४ | १३५ |
| १९१५ | १४१ |
| १९१६ | १३७ |
| १९१७ | १४४ |
| १९१८ | १५४ |
| १९१९ | १६९ |

वरील सालांत विम्याच्या उत्पन्नाचा बराचसा भाग विमा फंडांत टाकण्यांत येत असे आणि हिंदी कंपन्यांचे एकूण आकडे घेतले तर ह्या फंडांत वर्षानुवर्ष सारखी वाढ झाली असल्याचें दिसतें. खर्चाचें उत्पन्नाशीं प्रमाणहि युद्ध परिस्थितीमुळें बिघडलें नाहीं, हें खालीं दिलेल्या आकड्यांवरून स्पष्ट होईल:—

खर्चाचें प्रमाण

| वर्ष | शेकडा प्रमाण |
|---|---|
| १९१३ | २२.२ |
| १९१४ | २१.६ |
| १९१५ | २१.१ |
| १९१६ | २०.५ |
| १९१७ | २०.१ |
| १९१८ | २१.९ |
| १९१९ | २४.८ |

युद्धाचे परिणाम प्रत्यक्ष भोगावे लागणाऱ्या देशांची विम्याचे संबंधांतली स्थिति अर्थातच भिन्न होती आणि ब्रिटिश विमा मंडळ्यांस मागील युद्धांत बराच स्वार्थत्याग करावा लागला होता. (१) मृत्यूंचें प्रमाण वाढण्यानें त्या योगानें मंडळ्यांस दर वर्षी सरासरीनें ४ कोटि रुपये नुकसान आलें. (२) हल्ल्यांच्यासाठीं शांततेच्या काळीं जेवढी तरतूद पुरे होत असे तिच्यापेक्षां दरवर्षी सुमारें ५ कोटि रुपयांची जादा व्यवस्था करावी लागली. (३) प्राप्तिवरील कर वाढल्यानें मिळावयाच्या व्याजाच्या निव्वळ उत्पन्नांत अर्धा कोटीच्या वर घट पडली. ह्या तीन बाबींवर मिळून ब्रिटिश कंपन्यांस १० कोटि रुपये दर वर्षास कमी मिळाले. गेल्या महायुद्धाचे पूर्वीच्या काळांत त्यांचा वाटण्याजोगा वार्षिक नफा सुमारें ९ कोटि रुपये असे आणि त्यापैकीं सुमारें ६५ लक्ष रुपये भागीदारांस आणि बाकीचे साडे सात कोटि विमेदारांस मिळत असत. म्हणजे युद्धकाळांतील नुकसान पूर्वकालीन नफ्याइतकें झालें आणि त्या दोहोंची जणूं काय वजावाट होऊन युद्धामुळें विमामंडळ्यांचें पांच वर्षांचें बोनस बुडालें, एवढाच परिणाम झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ब्रिटिश विमामंडळ्यांच्या ह्या अनुभवावरून हिंदी मंडळ्यांस भीति बाळगण्याचें कारण नाहीं हें उघड होतें. उलट, सरकारी कर्जरोख्यांत आपला पैसा गुंतवून युद्ध यशस्वी होण्यास सहाय देणें त्यांस शक्य होईल. ह्यासंबंधांतली त्यांच्या मार्गांतली मोठी अडचण रोख्यांच्या बाजारभावांत घट होण्याची भीति आहे, तिच्याविषयींची आहे. कॅनडाच्या विमा कायद्याच्या धर्तीवर हिंदुस्थान सरकारनें ह्याबाबतींत तजवीज केली असतां ही अडचण सहज दूर होऊन विमामंडळ्यांस युद्धकर्जाचे रोखे विकत घेण्यास मार्गें पुढें पहाण्याचें कारण उरणार नाहीं. ह्या रोख्यांस विमा मंडळ्यांची चांगली मागणी येईल आणि त्यांचे भाव उचलून धरण्यास त्यांस सहाय देतां येईल.

---

उत्पन्नाचा अंदाज खोटा ठरणार काय ?

जून, १९४० मध्यें आयातीवरील जकातींचें उत्पन्न एप्रिल १९३९ मधील उत्पन्नाचे मानानें अर्ध्या कोटि रुपयांनीं घटलें. ब्रिटिश कापडाची आयात गेल्या वर्षीच्या मानानें शेकडा २५ इतकीहि झाली नाहीं. साखरेची आयात जवळ जवळ बंदच झाली आहे. गेल्या वर्षीच्या जूनमध्यें साखरेवरील जकातीनें ४० लक्ष रुपये दिले होते. १९४० च्या जूनमध्यें तिचें उत्पन्न केवळ ३७ हजार रुपयेच झालें. तंबाखू, पेट्रोल, रेडिओ सेट्स, दारू, इत्यादि वगळून बाकी सर्व जिनसांची आयात मंदावली. एक्साइजचें उत्पन्न चालू वर्षी १० कोटि रुपये होईल, असा फडनवीसांचा अंदाज आहे, परंतु पहिल्या तिमाहींत तें फक्त १ कोटि, ७२ लक्ष रुपयेच झालें आहे. कस्टम्सचें उत्पन्नहि अंदाजापेक्षा फार कमी होत आहे.

## हिंदी साखरेंत सुधारणा

हिंदुस्थानांतील साखर कारखान्यांत १९३९-४० मध्यें तयार झालेल्या साखरेच्या नमुन्यांच्या तपासणीवरून खालील निष्कर्ष निघत असल्याचें इंपीरिअल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजीचे डायरेक्टर, श्री. श्रीवास्तव, ह्यांनीं इंडियन ट्रेड जर्नलच्या ताज्या अंकांत प्रसिद्ध केलेल्या लेखावरून समजतें:—

( १ ) सर्व कारखाने नमुने पाठवीत नाहींत.

( २ ) एकाच प्रतीच्या साखरेस वेगवेगळ्या कारखान्यांत निरनिराळें नांव असल्याचें आढळतें. एकाच नांवाच्या साखरेची प्रत वेगवेगळी सापडूं शकते.

( ३ ) एकूण ८३ नांवांनीं हिंदी साखर, प्रतीप्रमाणें ओळखली जाते. उ० [ १ ] ए, [ २ ] ए. ए., [ ३ ] ए. ए. ए., [ ४ ] ए. ए. १०००, [ ५ ] ए. ए. १, इत्यादि.

( ४ ) बाजारांत साखर मुख्यतः चार नांवांनीं ओळखली जाते. [ १ ] स्पेशल, [ २ ] फर्स्ट क्रिस्टल्स, [ ३ ] सेकंड क्रिस्टल्स, [ ४ ] करड. पहिल्या दोन प्रकारच्या साखरेचें उत्पादन अधिक होतें.

( ५ ) लहान दाण्याची साखर तयार करण्याकडे कारखानदारांची प्रवृत्ति आहे.

( ६ ) कित्येक कारखान्यांची साखर रंग आणि दाण्याचा आकार ह्यांच्या बाबतींत विदेशी साखरेचे तोडीची आहे.

### ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीस 'नवयुगा'चा अल्पोपहार

नवयुग चित्रपट लि. चे मॅनेजिंग एजंट्स, हंस पिक्चर्स लि. यांनीं कॉंग्रेसची वर्किंग कामिटी व ऑल इंडिया कमिटी ह्यांस गेल्या रविवारीं पांच वाजतां कॉंग्रेस भुवनांत अल्पोपहार दिला. "लपंडाव" हा नवयुगाचा नवा चित्रपट त्यांस सोमवारीं सकाळीं दाखविण्यांत आला.

### हिंदुस्थानांत ब्रॉडकास्टिंगची प्रगति.

[ १ ] इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनीचें मुंबई केंद्र १९२७ साली स्थापन झालें, त्यावेळीं रेडिओचे लायसन्सवाले हजारावर नव्हते. आतां त्यांची संख्या ७२ पटींनीं वाढली आहे.

[ २ ] रेडिओ प्रोग्रॅम्सवर १९३०-३१ मध्यें ८०,४६९ रुपये खर्च झाला; १९३८-३९ मध्यें तो ५,३६,१४२ रुपये झाला.

[ ३ ] ह्याच मुदतींत दर ताशीं खर्च २२० रुपयांचा १,७४३ रुपयांपर्यंत वाढला.

### शांतिनिकेतन फोनवर आलें

शांतिनिकेतन ट्रंक टेलिफोनला जोडण्यांत आलें आहे. डॉ. रवींद्रनाथ टागोर ह्यांनीं शांतिनिकेतनमधून व पोस्ट आणि तारखात्याचे डायरेक्टर जनरल, सर गुरुनाथ बेवूर, ह्यांनीं दिल्ली येथून एकमेकांशीं संभाषणें करून ट्रंक टेलिफोनचा प्रथम उपयोग केला.

### साखरेचा साठा

१९३८–३९ च्या हंगामांत ह्या सुमारास हिंदी साखर कारखान्यांजवळ जेवढी साखर शिलक होती, तिच्या सहापट साठा आज त्यांचेजवळ पडून आहे. पुढील हंगामांत साखरेचें उत्पादन एकदम कमी तरी केलें पाहिजे, नाहीतर उंसास किंमत तरी कमी दिली पाहिजे, असें श्री. बी. एम. बिर्ला ह्यांचें मत आहे.

### मालाचा खप वाढविण्याचा प्रयत्न

हिंदी मालाचा आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया येथें खप वाढविण्याचा हिंदुस्थान सरकार प्रयत्न करीत आहे.


स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक– दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ६
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, हरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.
Work-Shop Address: 153 Kasaba, Poona 2
Branch No. 1 Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १०६—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९०—२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१—४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ८८—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९५—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | ११९— |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १००—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१) ... ... | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | ११२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०३—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३४–१२ |
| इंपिरियल बँक ( ५०० ) १२% ... ... | १४४५—० |
| बाँबे मॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५१—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १००—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४०–११–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३—०–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १२५—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३१५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५१०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १०२०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८½% ... ... ... | ७७७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २०३—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४४—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—९ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३७—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३४५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०५—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु, १० आ. ... | १४८—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३४९—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८३५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | ११३—८ |

दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर–विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा
दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा
डेक्कन जिमखाना

धी बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना—७ सप्टेंबर १९०६]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१३,००,०००

डायरेक्टर्स—सर चनीलाल मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई; ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. फेराई

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), अंधेरी ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों, व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लाग. त्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली




एजंटः—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव, पुणें शहर.

---

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्नेमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७१ सदाशिव, पुणें.

---

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

**दुसरी आवृत्ति तयार झाली.**

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तक मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व गोपाळ वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१ ३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.